इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७८/प्राशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट, २००९.

पहा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१, दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:-** शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने **इंग्रजी** माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या दोन्ही समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,१९० इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबत संस्थेची नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

४. शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/manharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८१८२१३४१३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.ऊ. रराळे )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण),यांचे खाजगी सचिव,
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,
अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | संत जनाबाई ग्राम विकास मंडळ सिरसम ता.पालम जि.परभणी | प्रथमेश प्राथमिक विद्यालय इंग्रजी माध्यम पालम ता.पालम जि.प... | इंग्रजी | १ ली |
| १६ | अहिल्यादेवी होळकर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था गंगाखेड जि.परभणी | प्रतिक प्राथमिक विद्यालय पालम ता.पालम जि.परभणी | | |

जिल्हा - हिंगोली

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | संजिवणी सेवाभावी बहुउद्देशिय सोसायटी कुरुंदा ता.वसमत जि.हिंगोली | लिटल किंग इंग्लीश स्कुल नांदेड रोड , वसमत | इंग्रजी | १ ली |
| २ | सरस्वती चारिटेबल ट्रस्ट वसमत | युनिव्हर्सल इंग्लीश स्कुल वसमत | इंग्रजी | १ ली |
| ३ | एकात्मिक ग्रामिण आणि कृषी विकास संस्था परभणी | स्विस ॲकडमी प्राथमिक इंग्लीश स्कुल खटकाळी हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| ४ | उर्मिला भटक्या विमुक्त महिला ग्रामविकास संस्था शेनोडी ता.कळमनुरी | सुलक्षण पब्लीक सेमी इंग्लीश स्कुल सिरसम बु जि.हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| ५ | अन्नपुर्णा शिक्षण संस्था हिंगोली | अन्नपुर्णा इंग्लीश स्कुल महाविर नगर , अकोला रोड , हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| ६ | कम्युनिटी ॲन्ड ॲग्रिकल्चर स्पॉन्सरशिप प्रोग्राम पिटा जि.परभणी | साईबाबा इंग्लीश स्कुल पेढा बु.ता.सेनगाव | इंग्रजी | १ ली |
| ७ | अहिल्यादेवी महिला व बाल विकास मंडळ, पारवा ता.जि.परभणी | गुरुकृपा इंग्लिश स्कुल, औंढा ना. | इंग्रजी | १ ली |
| ८ | अहिल्यादेवी महिला व बाल विकास मंडळ, पारवा ता.जि.परभणी | गुरुकृपा इंग्लिश स्कुल, नाईक नगर, हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| ९ | उर्मिला भटक्या विमुक्त महिला ग्रामविकास संस्था शेनोडी ता.कळमनुरी | गुरुकृपा इंग्लिश स्कुल, शास्त्री नगर, कळमनुरी | इंग्रजी | १ ली |
| १० | वासुदेव दत्तात्रय संस्थान हिंगोली | दत्तगुरु इंग्लिश स्कुल, साई नगर कळमनुरी | इंग्रजी | १ ली |
| ११ | राष्ट्रीय सम्राट शिक्षण संस्था, वांझोरा ता.हिंगोली | शाहु महाराज इंग्लिश स्कुल, कनेरगांव नाका ता.हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| १२ | श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, जवळा बा. ता.औंढा ना. | श्री शिवाजी प्राथमिक इंग्लिश स्कुल जवळा बाजार | इंग्रजी | १ ली |
| १३ | ज्ञानसागर शिक्षण संस्था शास्त्रीनगर हिंगोली | स्माईल फेस इंग्लीश स्कुल हनुमान नगर हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| १४ | नवभारत शिक्षण संस्था पोतरा ता.कळमनुरी | नवभारत प्रा.वि.कारवाडी ता.जि.हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| १५ | संत तुकाराम सेवाभावी संस्था डिग्रस क. ता.जि.हिंगोली | न्यु इंग्लीश स्कुल प्रा.शाळा डिग्रस क. ता.जि.हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| १६ | ज्ञानसागर शिक्षण संस्था शास्त्रीनगर हिंगोली | ज्ञानगंगा इंग्लीश स्कुल कन्हेरगाव नाका ता.जि.हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| १७ | सुर्योदय शैक्षणिक सेवाभावी संस्था करुंजळा ता.वसमत | युनिक प्रायमरी इंग्लीश स्कुल जवळा बाजार | इंग्रजी | १ ली |
| १८ | मोहम्मद नवाज ऐजुकेशनल अॅन्ड वेलफेअर सोसायटी हिंगोली | मोहंमदिया प्रा.शा.इग्रजी आजम कॉलनी ता.जि.हिंगोली | इंग्रजी | १ ली |
| १९ | शांतीदुत प्रतिष्ठान डोंगरकडा ता.कळमनुरी | साधना इंग्लीश स्कुल डोंगरगाव फाटा ता.कळमनुरी | इंग्रजी | १ ली |

जाक्र/जिपहिं/शिवि/खाप्रा-2/ 2797 /2011
शिक्षणविभाग(प्रा),जिल्हा परिषद,हिंगोली
दिनांक :- 25 / 11 /2011

**प्रति,**

**अध्यक्ष / सचिव**
**एकात्मिक ग्रामिण आणि कृषी विकास**
**संस्था परभणी ता.जि.परभणी**

**विषय :- सन 2009-2010 या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर शाळा सुरु करण्यास खाते मान्यता देणे बाबत.**

**संदर्भ :-** 1) शासन मान्यता पत्र क्रंमाक नप्राशा - 1008/प्र.क्र 679/प्राशि-3 दि.20/08/2009
2) मा.शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचे पत्र प्रावि-1/09-10/41223/22 दि.11/11/2009
3) या कार्यालयाचे आदेश जाक्र/जिपहिं/शिवि/खाप्रा-2/101/2010 दि.08/01/2010
4) **शिक्षण समिती बैठक ठराव क्रंमाक 194 दिनांक 06/12/2010**

खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देण्याबाबत आपल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, खालील नमुद केल्याप्रमाणे आपल्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन शैक्षणिक वर्ष **2009-2010** मध्ये **जुन 2009** पासुन विहित अटिवर व खास करुन खालील अटीची पुर्तता करण्याच्या धर्तीवर कायम विना अनुदान तत्वावर **(माध्यम इंग्रजी )** तत्वावर खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास संदर्भिय शासन पत्र क्रंमाक 01 व 03 अन्वये मंजुरी दिली आहे. **तसेच शिक्षण समिती दिनांक 06/12/2010 ठराव क्रंमाक 194 प्रमाणे आपल्या संस्थेस** खालील अटी व शर्तीस अधिन राहुन विवरण प्रपत्र अ मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे प्राथमिक शाळा सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील :-**

- संस्था सदरिल शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.
- संस्थेस शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली 1949 मध्ये विहित केलेल्या अटिनुसार जागा,वर्ग खोल्या, शैक्षणिक साहित्य, इतर आवश्यक सुविधाची तव्दतच क्रिडागण इत्यादीची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या वयोमर्यादेतील प्रशिक्षित शिक्षक वर्ग मागासवर्गीय प्रमाणासह नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.
- संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे उदा. वर्गातील विद्यार्थी तसेच इत्यादीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
- संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुषपरिणाम होणार नाहीत यांची दक्षता घेतली पाहिजे.

- संबधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 व संस्था नोंदणी अधिनियम 1860 या दोन्ही अधिनियमाखाली नोंदणी असावी.
- संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.
- संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळेपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढुन घेतलेली नसावी.
- संस्थेने कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी नसाव्यात अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबीत नसावे. संस्थेस शाळेची भाग शाळा काढता येणार नाही.संस्थेची आर्थिक परिस्थिती समाधानकारक असणे क्रमप्राप्त आहे.

वरिल सर्व अटि व शर्ती इत्यादींची पुर्तता संस्थेने तात्काळ नजीकच्या काळात करुन घ्यावी. ज्या शाळा संस्था शासन नियमाचे तंतोतत पालन करीत नसतील अगर अटी व शर्तीची पुर्तता करुन घेणार नाही अशा संस्थेविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**विवरण पत्र अ**

**शैक्षणिक वर्ष 2009-2010 मध्ये जुन 2009 पासुन खाजगी प्राथमिक शाळांना खाते मान्यता द्यावयाच्या परवानगी बाबत.**

| अक्र | संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण | वर्ग | माध्यम |
|---|---|---|---|---|
| 01 | एकात्मिक ग्रामिण आणि कृषी विकास संस्थ परभणी | स्विस ॲकडमी प्राथमिक इंग्लीश स्कुल खटकाळी हिंगोली | पहिला | इंग्रजी |

शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद हिंगोली

**प्रतिलीपी :-**

- मा.शिक्षण उपसंचालक औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव.
- गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगोली/वसमत/कळमनुरी/औंढा(ना)/सेनगाव यांना देवुन कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील संस्था/शाळा विहित अटीची पुर्तता करित आहेत किंवा नाही याबाबत आढावा घेवुन अटीची पुर्तता करुन घेण्यात यावी व शाळांची नियमित तपासणी करुन मार्गदर्शन करावे व वेळोवेळी शाळेस भेट देण्यात यावी.

शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद हिंगोली

जाक्र/जिपहिं/शिवि/खाप्रा-2/2798/2011
शिक्षणविभाग (प्राथ),जिल्हा परिषद हिंगोली
दिनांक :-25/11 / 2011

**प्रति,**

**मुख्याध्यापक,**
स्विस अॅकडमी प्राथमिक
इंग्लीश स्कुल खटकाळी हिंगोली

**विषय :-** खाजगी कायम विना अनुदानित प्राथमिक शाळांना इयत्ता 2 री ते 7 वी चे नैसर्गिक वाढीचे वर्ग मंजुर करणे बाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रंमाक व्हीएलएस/1002 (1000/03)/प्राशि-3 दिनांक 23/09/2003

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्रंमाक 01 च्या शासन निर्णयाच्या अधिन राहुन आपल्या शाळेस त्यांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे कायम विना अनुदानित तत्वावर नैसर्गिक वाढीने वर्ग मंजुर करण्यात येत आहे.

सदरिल वर्ग खाली दर्शविलेल्या अटिच्या आधिन राहुन मान्यता देण्यत येते.

| संस्थेचे/ शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | विवरण |
|---|---|---|---|
| एकात्मिक ग्रामिण आणि कृषी विकास सस्था परभणी व्दारा संचलित स्विस अॅकडमी प्राथमिक इंग्लीश स्कुल खटकाळी हिंगोली | ~~मराठी~~ इंग्रजी | इ.2 री<br>इ.3 री | इयत्ता 2 री जुन 2010 व इयत्ता 3 री जुन 2011 पासुन <u>**कायम विना अनुदान**</u> तत्वावर परवानगी देण्यात येते. |

**अटि व शर्ती :-**

- नव्याने सुरु करण्यात आलेल्या वर्गासाठी विषयाप्रमाणे विद्यार्थी पटसंख्या / सरासरी उपस्थिती असली पाहीजे.
- प्रशिक्षित व आवश्यक तेवढया शिक्षकांची / कर्मचाऱ्यांची नियुक्ती असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक साहित्य विद्यार्थी करिता बसण्याची सोय इमारत,फर्निचर व आवश्यक बाबी पुरविण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.
- भाग शाळा उघडता येणार नाही.
- प्रत्येकी वर्ग निहाय शासन निकषाप्रमाणे विद्यार्थी पट असणे आवश्यक आहे. त्या सर्व विद्यार्थ्यांची शाळा सोडल्यास मुळ प्रमाणपत्र अधिकाऱ्यांस मुख्याध्यापकानी दाखविणे बंधनकारक आहे.
- शासनाने शाळेस कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिल्यानुसार शाळा / वर्ग अनुदानास पात्र होणार नाही.अनुदानाची मागणी करता येणार नाही.

**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद हिंगोली**

**प्रतिलीपी :-**

- मा.शिक्षण उपसचालक औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
- गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगोली यांना माहितीस्तव.

**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद हिंगोली**

जाक्र/जिपहिं/शिवि/खाप्रा-2/722/2014
शिक्षणविभाग (प्राथ),जिल्हा परिषद हिंगोली
दिनांक :-16 /12/2014

**प्रति,**

**मुख्याध्यापक,**
**स्विस ॲकडमी प्राथमिक इंग्लीश स्कुल**
**खटकाळी हिंगोली ता.जि.हिंगोल**

**विषय :-** खाजगी कायम विना अनुदानित प्राथमिक शाळांना इयत्ता 2 री ते 7 वी चे नैसर्गिक वाढीचे वर्ग मंजुर करणे बाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रंमाक व्हीएलएस/1002 (1000/03)/प्राशि-3 दिनांक 23/09/2003

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्रंमाक 01 च्या शासन निर्णयाच्या अधिन राहुन आपल्या शाळेस त्यांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे **कायम विना अनुदानित** तत्वावर नैसर्गिक वाढीने वर्ग मंजुर करण्यात येत आहे.

सदरिल वर्ग खाली दर्शविलेल्या अटिच्या आधिन राहुन मान्यता देण्यत येते.

| संस्थेचे/ शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | विवरण |
|---|---|---|---|
| एकात्मिक ग्रामिण आणि कृषी विकास संस्था परभणी व्दारा संचलित स्विस ॲकडमी प्राथमिक इंग्लीश स्कुल खटकाळी हिंगोली ता.जि.हिंगोली | इंग्रजी | इ.4 थी<br>इ.5 वी<br>इ.6 वी | इयत्ता 4 थी जुन 2012, इयत्ता 5 वी जुन 2013 व इयत्ता 6 वी जुन 2014 पासुन **कायम विना अनुदान** तत्वावर परवानगी देण्यात येते. |

**अटि व शर्ती :-**

- नव्याने सुरु करण्यात आलेल्या वर्गासाठी विषयाप्रमाणे विद्यार्थी पटसंख्या / सरासरी उपस्थिती असली पाहीजे.
- प्रशिक्षित व आवश्यक तेवढया शिक्षकांची / कर्मचाऱ्यांची नियुक्ती असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक साहित्य विद्यार्थी करिता बसण्याची सोय इमारत,फर्निचर व आवश्यक बाबी पुरविण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.
- भाग शाळा उघडता येणार नाही.
- प्रत्येकी वर्ग निहाय शासन निकषाप्रमाणे विद्यार्थी पट असणे आवश्यक आहे. त्या सर्व विद्यार्थ्यांची शाळा सोडल्यास मुळ प्रमाणपत्र अधिकाऱ्यांस मुख्याध्यापकानी दाखविणे बंधनकारक आहे.
- शासनाने शाळेस कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिल्यानुसार शाळा / वर्ग अनुदानास पात्र होणार नाही.अनुदानाची मागणी करता येणार नाही.

**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद हिंगोली**

**प्रतिलीपी :-**

- मा.शिक्षण उपसचालक औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
- गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगोली यांना माहितीस्तव.

**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद हिंगोली**

जाक्र/जिपहिं/शिवि/खाप्रा-2/ 190 /2016
शिक्षणविभाग (प्राथ),जिल्हा परिषद हिंगोली
दिनांक :- 20/04/ 2016

प्रति,

मुख्याध्यापक,
स्विस ॲकडमी प्राथमिक इंग्लीश स्कुल
खटकाळी हिंगोली ता. जि. हिंगोली

विषय :- खाजगी कायम बिना अनुदानित प्राथमिक शाळांना इयत्ता 2 री ते 7 वी चे नैसर्गिक वाढीचे वर्ग मंजुर करणे बाबत.

संदर्भ :- 1. शासन निर्णय क्रमाक व्हीएलएस/1002 (1000/03)/प्राशि-3 दिनांक 23/09/2003
2. आपला प्रस्ताव क्र. 24/2015 दिनांक 09/09/2015.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्रमाक 01 च्या शासन निर्णयाच्या अधिन राहुन आपल्या शाळेस त्यांच्या नावापुढे दर्शविल्याप्रमाणे **कायम विना अनुदानित** तत्वावर नैसर्गिक वाढीने वर्ग मंजुर करण्यात येत आहे.

सदरिल वर्ग खाली दर्शविलेल्या अटिच्या आधिन राहुन मान्यता देण्यत येते.

| संस्थेचे/ शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | विवरण |
|---|---|---|---|
| एकात्मिक ग्रामिण आणि कृषी विकास संस्था परभणी व्दारा संचलित स्विस ॲकडमी प्राथमिक इंग्लीश स्कुल खटकाळी हिंगोली ता.जि.हिंगोली | इंग्रजी | इ. 7 वी | इयत्ता 7 वी जुन 2015 पासुन **कायम विना अनुदान** तत्वावर परवानगी देण्यात येते. |

अटि व शर्ती :-

- नव्याने सुरु करण्यात आलेल्या वर्गासाठी विषयाप्रमाणे विद्यार्थी पटसंख्या / सरासरी उपस्थिती असली पाहीजे.
- प्रशिक्षित व आवश्यक तेवढ्या शिक्षकांची / कर्मचाऱ्यांची नियुक्ती असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक साहित्य विद्यार्थी करिता बसण्याची सोय इमारत,फर्निचर व आवश्यक बाबी पुरविण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.
- भाग शाळा उघडता येणार नाही.
- प्रत्येकी वर्ग निहाय शासन निकषाप्रमाणे विद्यार्थी पट असणे आवश्यक आहे. त्या सर्व विद्यार्थ्यांची शाळा सोडल्यास मुळ प्रमाणपत्र अधिकाऱ्यांस मुख्याध्यापकानी दाखविणे बंधनकारक आहे.
- शासनाने शाळेस कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिल्यानुसार शाळा / वर्ग अनुदानास पात्र होणार नाही.अनुदानाची मागणी करता येणार नाही.

शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद हिंगोली

प्रतिलीपी :-

- मा.शिक्षण उपसंचालक औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
- गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगोली यांना माहितीस्तव.

—स्वा—
शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद हिंगोली

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१७/प्र.क्र.८०/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: २४ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. प्राशातु-१११२/(२५८/२०१३)/ प्राशि- ३, दिनांक २/७/२०१३,
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७ /७३४०/प्रशा-ड/ ५१२-अ-१/२०७०, दिनांक २८/०४/२०१७,
३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/ड/५१२-अ-१/२०४६, दिनांक ७/९/२०१७,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/वर्गवाढ/१४१२१/ड ५१२-अ-१/४८३३, दिनांक २६/१०/२०१७,

शासन निर्णय:-

खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेचे नाव | माध्यम | वर्ग | मंजूर वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | वसंतदादा प्राथमिक शाळा मुखेड ता. मुखेड जि. नांदेड | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| २ | आनंद गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कुल सात्रळ ता. राहुरी जि. अहमदनगर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ३ | सै.न.सो. कळसकर प्राथमिक विद्यालय इंदिरा नगर संगमनेर जि. अहमदनगर | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ४ | रेनबो कॉन्व्हेंट गोविंदप्रभू नगर, नागपूर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| ५ | स्वीस ॲकडमी इंग्लिश मिडीयम, स्कुल दत्तधाम परिसर परभणी ता. जि. परभणी | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| ६ | स्वीस ॲकडमी इंग्लिश मिडीयम, स्कुल खटकाळी परिसर हिंगोली | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |

२. वरील शाळांना सन २०१६-१७, या वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील,

२. शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,

३. सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ.वा. वीरवणकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
३. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे, औरंगाबाद, लातूर, नागपूर,
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर, परभणी, हिंगोली, नांदेड, नागपूर,
७. निवडनस्ती एसएम-५.

जाक्र/जिपहिं/शिवि/खाप्रा-2/1210/2017
शिक्षण विभाग (प्राथ),जिल्हा परिषद हिंगोली
दिनांक :-12/12/ 2017.

प्रति,

मुख्याध्यापक,
स्विस ॲकडमी इंग्लीश स्कुल
खटकाळी परिसर हिंगोली

**विषय :-** खाजगी कायम विना अनुदानित /विना अनुदानीत /स्वयंअर्थसहाय्यीत प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग मंजुर करणे बाबत.

**संदर्भ :-**1) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011.
2. शासन निर्णय क्रंमाक प्राशातु -1112/(258/2012)/प्राशि-3 दिनांक :- 13/02/2013.
3. शासन निर्णय क्र. प्राशाव-2017/प्र.क्र. 80/एस.एम.5 , शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, दिनांक 24/11/2017
4. शिक्षण विस्तार अधिकारी यांचा तपासणी अहवाल दिनांक 29/09/2017
5. मुख्याध्यापक, स्विस ॲकडमी इंग्लीश स्कुल खटकाळी परिसर हिंगोली यांचे पत्र दिनांक :- 28/11/2017.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्रंमाक 01 ते 03 च्या शासन निर्णयाच्या अधिन राहुन आपल्या शाळेस त्यांच्या नावापुढे दर्शविल्या प्रमाणे विना अनुदानीत तत्वावर नैसर्गिक वाढीने वर्ग मंजुर करण्यात येत आहे.

सदरिल वर्ग खाली दर्शविलेल्या अटिच्या आधिन राहुन मान्यता देण्यात येते.

| संस्थेचे/ शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | मान्यतेचा प्रकार | ज्या वर्षापासुन मंजुर करावयाचे ते वर्ष | विवरण |
|---|---|---|---|---|---|
| एकात्मीक ग्रामीण आणी कृषी विकास संस्था परभणी ता. जि. परभणी व्दारा संचलीत स्विस ॲकडमी इंग्लीश स्कुल -खटकाळी परिसर हिंगोली | इंग्रजी | इयत्ता 8 वी | स्वंय अर्थसहाय्यीत तत्वावर | 2017-18 | जुन 2017 पासुन इयत्ता 8 वी सुरु करण्यास स्वंय अर्थ सहाय्यीत /कायम विना अनुदानीत तत्वावर परवानगी देण्यात येते. |

**अटि व शर्ती :-**

- शाळेला वर्ग खोली उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
- नव्याने सुरु करण्यात आलेल्या वर्गासाठी विषयाप्रमाणे विद्यार्थी पटसंख्या / सरासरी उपस्थिती असली पाहीजे.
- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनीयम 2009 अन्वये शाळेने भौतीक सोई सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
- प्रशिक्षित व आवश्यक तेवढया शिक्षकांची / कर्मचाऱ्यांची नियुक्ती असणे आवश्यक आहे.

- शैक्षणिक साहित्य विद्यार्थी करिता बसण्याची सोय इमारत,फर्निचर व आवश्यक बाबी पुरविण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.
- प्रत्येकी वर्ग निहाय शासन निकषाप्रमाणे विद्यार्थी पट असणे आवश्यक आहे. त्या सर्व विद्यार्थ्यांची शाळा सोडल्यास मुळ प्रमाणपत्र अधिकाऱ्यांस मुख्याध्यापकानी दाखविणे बंधनकारक आहे.
- या आदेशान्वये मान्यताप्राप्त खाजगी अनुदानीत /विना अनूदानीत /कायम विना अनूदानीत शाळांमधील इयत्ता 5 वी व 8 वी च्या वर्गांना शासन मान्यता दिल्यामुळे अनुदानाचा कोणताही हक्क प्राप्त होत नाही. या वर्गांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छा अधिकार असून निधीच्या उपलब्धते नुसार त्याची अमलबजावणी करण्यात येईल.
- तसेच शासन निर्णय दिनांक 28.08.2015 नुसार नैसर्गिक वाढ बंद करण्यात आलेली असल्याने इ. 5 वी व इ. 8 वी नंतर प्रस्तूत शाळांना नैसर्गिक वाढ लागु राहणार नाही.

**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद हिंगोली.**

**प्रतिलीपी :-**

- मा. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
- गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हिंगोली यांना देऊन सुचित करण्यात येते कि, आपण वेळोवेळी सदर शाळेस भेटी देऊन मार्गदर्शन करावे.

— स्वा. —
**शिक्षणाधिकारी (प्रा),**
**जिल्हा परिषद हिंगोली.**